Historicity Research Journal
ISSN : 2393-8900

Impact Factor : 1.9152 (UIF)
Volume - 3 | Issue - 12 | Aug – 2017

# स्त्रीवादी सिध्दांत आणि इतिहासलेखन

प्रा. श्रीमती कोन्हाळी व्ही.पी.
पूर्ण वेळ शिक्षक, इतिहास विभाग, सी.बी.खेडगीज् बसवेश्वर सायन्स, कॉलेज-
राजा विजयसिंह कॉमर्स, ॲण्ड राजा जयसिंह आर्टस् अक्कलकोट जि-सोलापूर.



**प्रस्तावना :**

इतिहास लेखन या संज्ञेला स्त्रीवादाने एक नवा अर्थ प्राप्त करुन दिला आहे. इतिहास लेखन करताना लेखनाचा म्हणजे भाषा व लिपीचा भाग येतो. त्याचा बारकाईने विचार करुन त्यातील अंत:स्तर स्त्रीवादाने शोधण्याचा प्रयत्न केला. स्त्रीवादाची व इतिहासलेखनाची नेमकी संदर्भचौकट तयार झाल्यावरच योग्य अन्वयार्थ व अर्थ लावणे शक्य होते. स्त्रीवादाच्या आगमनाच्या बऱ्याच काळखंडानंतर याविषयी बोलले गेले. भारतात तर स्त्री इतिहास लेखनाचा विचार हा गेल्या तीन दशकातील विषय आहे.

हिस्ट्रोरिओग्राफी म्हणजे इतिहासलेखन आणि फेमिनिझम म्हणजे - स्त्रीवाद इंग्रजीतील 'हिस्टरी' म्हणजे मराठीत 'इतिहास' होय. चौकशी करणे, शोधणे, माहिती मिळविणे हा शब्द विकसित झाला. या अर्थी असे घडले ते सांगण्याची पध्दत म्हणजे इतिहास = इति + ह + आस म्हणजेच 'असे असे घडले'.

भारतात वसाहतिक कालखंडापासून इतिहास लेखनाबाबत नवी जाणीव उदयास आली. आधुनिक इतिहास लेखनापेक्षा वसाहतकारानी घडवलेली गतकाळाबद्दलची जाणीव भिन्न होती. साम्राज्यवादी इतिहास लेखनाने जेम्स मिलसारख्याच्या ग्रंथानी इतिहास म्हणजे काय याची जाणीव करुन दिली. मार्क्सवादाच्या आगमनाने भारतातील इतिहासाचे स्वरुप बदलले.

## इतिहास लेखन व स्त्रियांचा प्रश्न -

१९७० च्या दशकातील स्त्री चळवळीने व त्यातील प्रेरणेने स्त्री अभ्यास ज्ञानशाखा विकसित होत गेली. 'स्त्रियांचा प्रश्न' विविध ज्ञानशाखांमधून कसा घडवला जातो यास स्त्रीवादाने वाचा फोडली. यात प्रत्येक टप्यावरील आंतरसंबंध तपासणे हे सुरुवातीच्या स्त्रीवादी इतिहासलेखनाचे स्वरुप होते. असे मेरी जॉन स्पष्ट करतात. (जॉन २००८:१०६-१०७) स्त्रीवादाबद्दलची संकल्पना व प्रतिमेची छाननी असे दुहेरी काम स्त्रीवादी इतिहास लेखनाने सुरुवातीच्या टप्प्यावर केले. जसे जसे स्त्रीबद्दलचे आकलन बदलत गेले तसे स्त्रीवादी इतिहास लेखनाचे स्वरुप बदलले.

स्त्री वादी इतिहासलेखन ही अचानक निर्माण झालेली प्रक्रिया नाही तर तर स्त्रियांचा इतिहास, लिंगभवात्मक इतिहास व स्त्रीवादी इतिहास असे विविध प्रकारे टप्पे पाहता येतात. जॉन केली - गेडॉल म्हणतात, 'स्त्रीवादी इतिहासलेखनाच्या इतिहासाच्या कालखंडात्मक आकलनावर, सामाजिक विश्लेषणावर, व सामाजिक बदलाच्या सिध्दांकनावर मोठा प्रभाव पडला आहे. (केली-गेडॉल- १९७६-८०५)

## चार टप्पे-

भारतात १९७५ नंतर विविध सामाजिक चळवळीनी विविध ज्ञानक्षेत्रांची व ज्ञानशाखांची खोलवर चिकित्सा केली. स्त्रियांचे दास्यत्व कसे व का होते यासाठी इतिहास पडताळून पाहावा लागला. यातून स्त्रीवादी इतिहासलेखनाचा एक ज्ञानशाखा म्हणून विकास होत गेला. या विकासाचे विविध टप्पे (रेगे १९९८:९६,९७) सांगितले आहेत. टप्प्यावर असामान्य व विशेष स्त्रियांबद्दल लिखाण करणे, शौर्यकथा सांगणे हे इतिहासलेखनाचे स्वरुप होते, दुसऱ्या टप्प्यावर स्त्रियांवर झालेल्या अत्याचाराला केंद्रस्थानी ठेऊन इतिहासलेखन केले. तिसऱ्या टप्प्यात विविध क्षेत्रातील स्त्री कामगिरीला उजाळा दिला गेला. चौथ्या टप्प्यात लिंगभावनात्मक जाणीव कशी घडत जाते व घडवली जाते हा प्रयत्न केला गेला. या चार टप्प्यातून भारतातील - स्त्रीवादी इतिहासलेखनाचा विकास शोधता येतो.

स्त्रीवादी इतिहासलेखन म्हणजे केवळ स्त्रियाबद्दल लेखन करणे नव्हे, स्त्री व पुरुष या दोघांचाही इतिहास सामाजिकतेच्या संदर्भात पाहणे हे स्त्रीवादी इतिहास लेखनात अपेक्षित असते. नवाश्मयुगातील पितृसत्ता अधिक घट्ट कशी होत गेली. हे जाणणे लोकगीतेतील सीमेचे महत्त्व स्त्रीवादी इतिहासलेखनात महत्वाचे आहे. कारण -

'राम म्हणु नये राम । नाही सीतेच्या तोलाचा ।
हिरकणी सीतामाय । राम हलक्या दिलाचा ।' (स्त्रिवादी इतिहासलेखन : १३०)

या इतिहासलेखन मीमांसामधील तत्सम काव्यपंक्तिचे सुध्दा महत्त्व स्त्रीवादी इतिहासलेखनात आहे. म्हणजे आम्ही -स्त्रीवादी इतिहासलेखन करायला शिकत आहोत. इतिहासातील स्त्रियांच्या स्थानाची पुनर्व्याख्या करीत आहोत. या लेखनातून केवळ स्त्री इतिहास निर्माण होणार नाही तर तो 'इतिहास' म्हणून नवा असेल कसे ॲन गॉर्डन, मारी बुहले, नॅन्सी डे या स्त्रीवादी इतिहासकारांचे स्पष्टीकरण बेरेमिक कॅरॉल यांच्या संपादित (लिबरे टिंग वुमेन्स हिस्टरी १९७६) या ग्रंथात आढळते.

स्त्रीवादी इतिहासलेखन करताना सिध्दांत व माहिती या दोन्ही विषयी सहजता बाळगणे आवश्यक आहे. स्त्रीवादी इतिहासकार एक नैतिक व राजकीय धारणेतून इतिहासलेखन करणार, असे इतिहासलेखन नेहमीच ज्ञानशाखेच्या चौकटीबाहेरचे कार्य करते असे सूर स्त्रीवादी इतिहासलेखनाबद्दल बोलले जातो. वस्तूत: राजकीय सत्तासंबंधाच्या पलिकडे इतिहास ही एक कधीच ज्ञानशाखा म्हणून अस्तित्त्वात नव्हती. स्त्रीवादी सिध्दांत इतिहासलेखनाने आपल्या बौध्दिक व राजकीय मिशन ला अधिक महत्त्व दिले इतिहास व स्त्रीवाद याचे संबंध कष्टदायी होत गेले. (नायर : ५७) या कष्टपर संबंधात जे 'इतिहास' म्हणून नवीन माहिती पुढे येते व ज्या विषयांचा स्त्रीवादी इतिहास लेखनात समावेश होतो त्यातून हा ताण वाढत जातो. कुटुंब संबंधावर प्रकाश टाकणे, लैंगिक दुय्यमत्त्वाचे संस्थात्मक आकलन करणे, इतिहासाच्या टप्प्यावर निर्माण झालेले पितृसत्तेच्या स्वरुपाचे भाष्य करणे. इत्यादी विषयांना इतिहासलेखनमध्ये कथित करताना इतिहासकारांमध्ये अस्वस्थता जाणवतान दिसते.

## लिंगभाव व स्त्रीवाद-

स्त्रीच्या अनुभवांचे विश्लेषण करण्यासाठी लिंगभाव हा सामाजिक कोटिक्रम आहे हे स्पष्ट करणे सत्तासंबंधाशी आणि सत्ताविस्ताराशी लिंगभावाचा संबंध जोडलेला असतो. सामाजिक राजकीय संरचनामधून स्त्रीत्व व पुरुषत्व कसे घडवले जाते. याबाबतची स्पष्टता व जाणविणे गरजेचे असते. अमेरिकन स्त्रिवादी नॅन्सी कॉट व इस्टेल फ्रीडमन या इतिहासकारांनी स्त्रियांची खाजगी परिवेशात जी घडण होते व घरगुती पणातुन स्त्रिया प्रकट होतात त्यांना महत्त्व देऊन स्त्रीवादी इतिहास लेखन पुढे न्यावे असे सुचविले आहेत. (मॉर्गन २००६:७-८) स्त्रिवादी इतिहास लेखनामुळेच स्त्रीच्या जडणघडणीच्या भिन्न भिन्न संरचनात्मक संहिता उपलब्ध झाल्या हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.

## भाषिक वळण-

स्त्रीवादी इतिहास लेखनाचे वैशिष्ट म्हणजे संपूर्ण इतिहासच समजावून घेणे म्हणजेच लिंग्विस्टिक टर्न (भाषिक वळण) होय, भाषेच्या माध्यमातून इतिहासिक घटना व ऐतिहासिक जाणीव घडवली जाते असे भाषाभ्यासकांनी स्पष्ट केले. भाषिक वळणानंतर स्त्रीवादी इतिहासलेखनाला नवे संदर्भ प्राप्त झाले, गुलामगिरी, वसाहतवाद, स्त्रीवाद व यांचा इतिहास पुन्हा मांडला गेला. शरिरता दुय्यमत्व निर्माण करणे, स्त्रिचे अनुभव महत्त्वाचे असतात. अशा पलिकडे जाण्यासाठी वंश, वांशिकता, लैंगिकता या संदर्भात इतिहासलेखन करण्यासाठी भाषिक वळणचा उपयोग झाला. १९७० च्या दशकानंतर स्त्रीवादाची बदललेली आकलने. स्त्रीवादातील निरनिराळे प्रवाह हे देखील स्त्रीवादी इतिहासलेखनात बदल घडवून आणले.

## स्त्रियाची स्थिती-

भारतीय इतिहास लेखनातील स्त्रियांची बेदखल नष्ट करणे, स्त्रियांवरील अत्याचार, स्त्रियांचे शोषण, त्यांचा इतिहास मांडणे, स्त्रियांच्या कर्तबगारीला अधोरेखित करणे, लिंगभावात्मक जडणघडणीतून इतिहासाची जाणीव इ. स्त्रीवादी इतिहासलेखनाचे उद्दिष्टे असे सांगता येतील. स्त्रियांचा इतिहास म्हणजे स्त्रीवादी इतिहासलेखन नव्हे तर लिंगभावात्मक जडणघडणीतून रचलेले वर्तमान व भूतकाळ तपासण्यात स्त्रीवादी इतिहासलेखनाला रस आहे. (संगारी व वैद्य १९८९:२) स्त्रीवादी इतिहासलेखन ही अकादमिक विश्वात केवळ अन्य एक ज्ञानशाखा होणार नाही याची खबरदारी स्त्री अभ्यासकानी घेतली पाहिजे असे वैद्य व संगारी बजावतात. पूर्वीच्या काळात स्त्रीने शेतीकाम सुरु केली. नंतर पितृसत्ताक कुटुंबव्यवस्था आली आणि तिला दुय्यम स्थान दिले गेले. त्या दुय्यमच कशा राहिल्या किंवा राहतात. आजही स्त्रियांना ५०% आरक्षण असूनही ती स्वत: हे सर्व जबाबदारीने का करु शकत नाही याकडेही स्त्री वादी अभ्यासकांनी लक्ष दिले पाहिजे. त्याचा शोध घेतला पाहिजे. ब्राम्हणी राष्ट्रवाद्यांनी आतले व बाहेरचे जग निर्माण केले. बाहेरचे जग भौतिक व या जगावर पुरुषांनी नियंत्रण मिळवून स्त्रियांवर पुरुषसत्ता कशी लादली याचा शोध स्त्रीवाद इतिहासलेखनात स्पष्ट दिले आहे. परंतु २० व्या शतकाच्या सुरवातीच्या काळात सत्य शोधक चळवळीने व स्त्री चळवळीने दुय्यमत्त्वाचा मुद्दा तपासला व लक्षात आणून दिला.

विविध सिध्दांकनांशी देवाण-घेवाण करीत स्त्रीवादी इतिहासलेखन जसे गतिमान झाले तसे विविध सामाजिक चळवळ व नवसामाजिक चळवळींनी स्त्री या कोटिक्रमाचा वेगळा अन्वयार्थ याचाही स्त्रीवादी इतिहासलेखनावर प्रभाव पडला. स्त्री या कोटिक्रमाची जडणघडण विषयीचे स्पष्टीकरण गेल ऑमव्हेट यांच्या रिझनव्हेन्टिंग रिवोल्युशन या ग्रंथात आढळते. आंबेडकरी चळवळीतील स्त्रियांच्या सहभागाविषयीचे मीनाक्षी मून व उर्मिला पवार यांचे 'आम्हीही इतिहास घडविला' हे लेखन महत्त्वाचे ठरले आहे. सामाजिक संरचनेचा काय वाटा

असतो? आजवर दडपले गेलेले इतिहासातील संदर्भ कोणकोणते? सार्वजनिक व खाजगी जगामध्ये स्त्रीत्वाची घडण भिन्न का राहते अशा मुद्द्यांची चर्चा स्त्रीवादी इतिहासलेखन करणाऱ्या इतिहासकारांनी केली आहे. (गलक आणि पताई १९९१:१-३).

विश्वनाथ शिंदे 'मराठी ऐकीव' ग्रंथातून दैनंदिन जीवनातील स्त्रियांच्या प्रतिकार तंत्रेही सांगितले आहे. ऐकिवातील ' स्त्रियांच्या अंगात बत्तीस नखरे', असतात असे कीर्तनकार सांगतात. कारण भोळाभाबडा शेतकरी जेव्हा आपल्या बायकोला नखरे बद्दल विचारतो तेव्हा ती चातुर्याने नखरा म्हणजे काय ते दाखवून देते. ' बत्तीस नखऱ्याची लावणी' मधून दैनंदिन जीवन जगत असताना स्त्री ही स्वत:साठी निर्माण केलेल्या अवकाशाचे कसे रक्षण करते हे बुध्दिचातुर्य दिसते हे पितृसत्तेला व धर्मसत्तेला कशी निरुत्तर करते हे चित्रण समजते.

### निष्कर्ष -

१) पुर्वीपासून स्त्री जीवन विषयीची माहिती होत गेली.
२) टप्प्याटप्प्यानुसार स्त्रिच्या जीवनात होत गेलेले बदल याची माहिती झाली.
३) स्त्रीची दुय्यम अवस्था व पितृसत्ताक कुटुंब पध्दतीत तिची स्थिती याविषयीची माहिती मिळाली.
४) अनेक ग्रंथ व इतिहासलेखनाची माहिती झाली.
५) तसेच लिंगभावात्मकता व दुय्यम स्थानाविषयीची माहिती मिळाली.
६) स्त्रीची बुध्दी व चातुर्याची माहिती मिळाली.

### संदर्भग्रंथ सूची -

१) निवडक समाज प्रबोधन पत्रिका खंड - १ (इतिहासलेखन मीमांसा)
२) उपयोजित इतिहास - १२ वी (पाठ्यपुस्तक अभ्यासक्रम मंडळ, पुणे)
३) स्त्रीवादी सिध्दांत - Wikipedia
४) इतिहासलेखन - Wikipedia
५) भारतीय स्वातंत्र्य चळवळ - ८ वी (पाठयपुस्तक अभ्यासक्रम मंडळ, पुणे)
६) १९ व्या शतकातील स्त्रियांची चळवळ